**नियमित दिवाणी दावा नं. ३३३/२०१२**

**निशाणी क्र. ११० वरील आदेश**

**सी.एन.आर.क्र. MHK0110008442012**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी कागदपत्रे हजर करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा वादी यांन प्रतिवादी यांचे विरुध्द मनाई करिता दाखल केलेला आहे. वादी यांचे म्हणण्याप्रमाणे तळसंदे येथील गट क्र. २१३ मधील विहीर ही समाईकातील आहे तर प्रतिवादी यांचे म्हणण्याप्रमाणे शिवा कांबळे यांचे मृत्युनंतर वडीलार्जीत शेतजमीनी सन १९८० ला वाटून घेऊन प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार रंगराव शिवा कांबळे यांनी जीवनधारा योजनेमधून स्वतःसाठी वाटून आलेल्या क्षेत्रामध्ये विहीर काढलेली आहे. तसेच सदर विहीरीवर मोटर बसवून स्वखर्चाने पाईपलाईन देखील केलेली आहे.

३. प्रतिवादी यांचे पुढे असे कथन आहे की, सदर विहीरीबाबत काही महत्वाची कागदपत्रे दाखल करायची आहेत. प्रस्तुतची कागदपत्रे ही प्रतिवादीचे पुर्वहक्कदारांनी दाखल केलेल्या दाव्यामध्ये दाखल होती व सदरचा दावा चौकशीअंती दिनांक २१/०१/२०२१ रोजी निकाली झाला. प्रस्तुतचा दावा सुरू असताना प्रतिवादी यांना नमुद कागदपत्रे मिळण्यास अडचणी येत होत्या. तरी प्रतिवादी यांनी नमुद कागदपत्रे दाखल करून घेण्यास परवानगी मागितली आहे.

४. प्रस्तुत अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करून विरोध दर्शविलेला आहे. प्रस्तुतचे काम आजरोजी युक्तीवादावर नेमलेले आहे त्यामुळे प्रतिवादी यांना नमुद कागदपत्रे दाखल करता येणार नाहीत. प्रतिवादी यांना यापूर्वी पुराव्याची संधी मिळालेली असताना देखील त्यांनी यापूर्वी नमुद कागदपत्रे दाखल केली नाहीत. प्रस्तुत प्रकरणाचा पुरावा संपलेला असल्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

५. प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील वादी यांचे म्हणणे व संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे सन्माननिय विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

६. *दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ८ नियम १(अ) अन्वये प्रतिवादी यांनी ज्या कागदपत्राच्या आधारे आपला बचाव करत आहेत किंवा ज्या कागदपत्रांचा त्यांनी दाव्याकामी बचाव करित असताना आधार घेतलेला आहे त्या कागदपत्रांपैकी जे कागदपत्र प्रतिवादी यांचे ताब्यात किंवा नियंत्रणात असतील ते कागदपत्र प्रतिवादी यांनी कैफियतीसोबतच दाखल करण्याचा पहिला टप्पा आहे. सर्वसाधारणपणे नियम असा आहे की, वादी व प्रतिवादी यांनी दावा प्रकरणात न्यायालयाने वाद मुद्दे निश्चित करण्यापूर्वी कागदपत्रे दाखल केली पाहिजेत. तथापी दावा विषयीसंबंधी अशी कागदपत्रे अथवा दस्तऐवज दाव्यातील पक्षकार न्यायालयाने वाद मुद्दे निश्चित करण्यापूर्वी त्यास दाखल करता आले नाहीत ते कागदपत्र सदर पक्षकार यांना सुनावणीदरम्यान करता येऊ शकतात, मात्र योग्य त्या टप्प्यावर ते कागदपत्र त्यांना दाखल का करता आले नाहीत याबाबत त्यांच्या अर्जात कारणे नमुद करून तो अर्ज दाखल केला पाहिजे. अर्थात नमुद केलेल्या कागदाबाबत न्यायालयाचे समाधान झालेस दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ८ नियम १(अ)(३) अन्वये न्यायालयाच्या परवानगीने दाखल करता येऊ शकतात.*

७. प्रस्तुत दाव्यातील अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द निरंतर मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला असून प्रस्तुतचा दावा सद्यस्थितीस अंतिम युक्तीवादावर प्रलंबित आहे. प्रतिवादी तर्फे सन्माननिय विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी प्रस्तुत अर्जान्वये जी कागदपत्रे दाखल करू इच्छीतात ती पूर्वी त्यांनी या दाव्यामध्ये दाखल केलेली होती. परंतू दावा मिळकतीबाबत वडगांव येथील न्यायालयातच दुसरा दिवाणी दावा प्रलंबित होता व सदर कागदपत्रे त्या दाव्यात आवश्यक होती. यास्तव वादी यांनी प्रस्तुतची कगदपत्रे या दाव्यामधून काढून सदर दाव्यात दाखल केलेली होती व सदर दाव्याचा न्यायनिर्यार्य ११/०१/२०२१ रोजी झालेला आहे. त्यानंतर प्रतिवादी हे सदर

कागदपत्रे प्रस्तुत दाव्याकामी दाखल करू इच्छीतात. प्रतिवादी तर्फे पुढे असाही युक्तीवाद करण्यात आला की, प्रतिवादी दाखल करू इच्छीतात ती कागदपत्रे प्रस्तुत दाव्याचा निर्णय होण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहेत. याउलट वादीतर्फे सन्माननिय विधीज्ञ यांनी युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा दावा सद्यस्थितीस अंतिम युक्तीवादावर नेमलेला आहे. सद्यस्थितीस प्रतिवादी यांना कागदपत्रे दाखल करता येणार नाहीत. त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी यांना त्यांचा पुरावा दाखल करण्याची पूर्ण संधी देऊन देखील त्यांनी कागदपत्रे वेळेत दाखल केली नाहीत.

८. प्रतिवादी तर्फे प्रस्तुत अर्जामध्ये दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता सदर कागदपत्रे हे रे.क.नं. ११३/२०13 या दाव्यामधून काढून प्रस्तुत दाव्यात दाखल केले असल्याचे स्पष्ट होते तसेच सदर कागदपत्रे प्रतिवादी यांनी प्रस्तुत दाव्याकामी दिनांक १०/०३/२०१२ रोजी यापूर्वी दाखल केले असल्याचे देखील स्पष्ट होते. त्यामुळे प्रतिवादी प्रस्तुत अर्जान्वये कागदपत्रे दाखल करण्यास जो विलंब झालेला आहे त्याबाबतची कागरणे कथन करतात ती संयुक्तीक वाटतात.

९. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी जे कागदपत्र दाखल करू इच्छीतात त्याचे अवलोकन केले असता सदरचे कागदपत्र हे या दाव्याच्या अंतिम निर्णय होण्याच्या दृष्टीने महत्वाचे दिसून येतात. सदर कागदपत्र दाखल करण्याची प्रतिवादी यांना परवानगी दिली नाही तर प्रकरणांचे बाहुल्य (Multiplicity of proceeding) वाढण्याची शक्यता आहे. तसेच सदरचा अर्ज मंजूर करणे हे प्रस्तुत दाव्यास न्यायनिर्णयाद्वारे अंतिम स्वरूप प्राप्त होण्याच्या दृष्टीने गरजेचे आहे . अशापरिस्थितीमध्ये प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. तसेच कागदपत्र दाखल करून घेतले म्हणजे ते शाबीत झाले असे नाही. ते शाबीत करण्याची जबाबदारी प्रतिवादी यांची आहे. परंतू प्रस्तुतचे कागदपत्र दाखल करण्यास प्रतिवादी यांना विलंब झालेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करत असताना प्रतिवादी यांच्यावर खर्च बसविणे न्यायोचित होईल. त्यामुळे न्यायाचा समतोल साधला जाईल. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आ दे श</u>

**१.** प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र. ११० रक्कम ₹२००/- वादी यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादी यांनी खर्च रक्कम ₹२००/- वादी यांना दिल्यानंतर कागदपत्रे दाखल करून घेण्यात येतील.

**३.** अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ठ करण्यात येतो.

सही/-

**दिनांक २२/०९/२०२१**

**( सी. एस. देशपांडे )**
**सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेठ-वडगांव.**

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. R. P. Moraskar |
| Name of Court | Shri. C. S. Deshpande Jt. Civil Judge Jr.Dn., Peth-Vadgaon. |
| Date of Dictation | 22/09/2021 |
| Judgment Signed by the P.O. on | 22/09/2021 |
| Judgment uploaded on | 22/09/2021 |